# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक :- ९८-२२** **दिनांक :- ०१/०४/२०२२**

## घरफोडी व चोरी करणारे सराईत आरोपीतांना अटक करुन एकुण ११ गुन्हे ऊघडकीस आणून ५,७०,५००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत.

दिनांक ११/०३/२०२२ रोजी २३:०० वा. ते दिनांक १२/०३/२०२२ रोजी ०८:०० वा. च्या दरम्यान फिर्यादी यांच्या गोपचरपाडा येथील कंपनीच्या गाळ्याचे बंद शटर उचकटून त्यामध्ये असलेले ४,५०,०००/- रुपये किमतीचे लोखंडी डाय आणि प्लेट्स अज्ञात चोरट्यांने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत यातील फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३४७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हयाचे घटनास्थळावरील प्राप्त तांत्रिक पुरावे, आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन यातील आरोपी नामे १. सजन बबन काकडे, वय २२ वर्षे, रा. चदंनसार रोड, विरार (पू.), ता. वसई, जि. पालघर, २. शंकर हाल्या दिवा, वय ३६ वर्षे, रा. कातकरी पाडा, विरार (पू.), ता. वसई, जि. पालघर, ३. त्रिलोकी दिनानाथ भगत, वय ३२ वर्षे, रा. कातकरी पाडा, विरार (पू.), ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक २७/०३/२०२२ रोजी कातकरी पाड्यामधून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपीतांकडे रुपये ०५,७०,५०० किमतीचे लोखंडी/मेटलचे डाय आणि क्लीप, लोखंडी प्लेट, पितळेची मुर्ती, मोबाईल फोन, गाडीचे टायर इ. असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीतांना दिनांक ०१/०४/२०२२ पावेतो पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

यातील अटक आरोपी हे स्क्रु ड्रायव्हरच्या सहाय्याने गाळ्याचे बंद शटरचे कडी-कोयंडा ऊचकटून त्यामध्ये असलेले लोखंडी/मेटलचे डाय आणि क्लीप चोरी करणे, उघड्या घरामध्ये प्रवेश करुन रोख रक्कम आणि मोबाईल फोन चोरी करणे, रस्त्यावर पार्क केलेल्या गाड्यांचे टायर चोरी करणे, मंदीरामधील दानपेटी/मुर्तीची चोरी करणे अशी त्यांची त्यांची कार्यपध्दती आहे. त्याकरीता दिवसाच्या वेळी परीसरामध्ये फिरुन रेकी करणे आणि रात्रीच्या वेळी ऑटोरीक्षामधून येऊन चोरी करणे.

**सदर आरोपीतांकडून ऊघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २४९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | २. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २८४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० |
| ३. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३२८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० | ४. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३४८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
| ५ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ९७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ | ६ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १८१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ७ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २४४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ | ८ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २२४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ९ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ८१३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३८० | १० | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ९३७/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३८० |
| ११ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६३४/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३७९ | | |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे , पोलीस उप आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. हर्षद चव्हाण, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे आणि सागर घुगरकर यांनी केली आहे.



*********